## भूमिका

**म**हाराष्ट्राचे शिल्पकार दिवंगत यशवंतराव चव्हाण यांचे विचार व कार्यापासून प्रेरणा घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ही संस्था १९८५ पासून कार्यरत आहे. आजवरच्या वाटचालीत अनेक क्षेत्रात या संस्थेने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. समाजातील विविध घटकांच्या विकास कार्याला योग्य दिशा मिळावी आणि त्याची परिणामकारकता वाढावी यासाठी संस्थेच्या विविध विभागांमार्फत कार्य सुरू आहे. समाज व शासनाच्या विविध घटकांमध्ये संवाद व समन्वयातून प्रत्यक्ष कृतिशीलतेकडे वाटचाल व्हावी, असा सातत्यपूर्वक संस्थेचा प्रयत्न असतो.

गेली वीस वर्षे महाराष्ट्रातील युवांसोबत *नवमहाराष्ट्र युवा अभियान* हा प्रतिष्ठानचा विभाग याप्रकारे कार्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यातून अनेक उपक्रम पुढे आले आणि अनेक कार्यकर्तेदेखील घडले. मात्र, तेवढे पुरेसे नाही हे लक्षात घेऊन समाजातील सर्वात जास्त संख्येने असणाऱ्या युवांना त्यांची स्वतंत्र ओळख देणे आणि त्यांच्या विकास व हक्कांसंबंधात शासनाने स्वत:चे धोरण निश्चित करणे याची अत्यंत आवश्यकता जाणवत होती. या दृष्टीने जानेवारी २००९ पासून अभियानाने पुढाकार घेऊन महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरणाची चर्चा सुरू केली. त्यासाठी महाराष्ट्रातील युवांसोबत कार्य करणाऱ्या विविध संस्था, संघटना व तज्ज्ञांसमवेत संवाद सुरू केला.

महाराष्ट्रात १३ ते ३५ वर्षे वयोगटातील युवांची संख्या ४२ टक्के आहे. अशा मोठ्या गटासाठी सरकारी, निमसरकारी, गैरसरकारी संस्था तसेच शिक्षण संस्था विविध विभागांमार्फत वेगवेगळे उपक्रम व योजना राबविल्या जात आहेत. युवा वर्ग स्वत: पुढाकार घेऊन युवा मंडळे, संस्था, संघटना स्थापन करीत आहे आणि आपल्या विकासाच्या नवनवीन क्षेत्रांचा शोध घेत आहे. अशा विविध कार्यक्रमांना दिशा देणे तसेच त्यात सुसूत्रता आणण्याची गरज समोर येत आहे. अशा वेळी सम्यक व समग्र युवा धोरण शासनाकडून व समाजाकडून युवांना त्यांच्या विकासासंदर्भात आश्वासन देऊ शकते.

हीच गरज लक्षात घेऊन नवमहाराष्ट्र युवा अभियान प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्राचे युवा धोरण तयार करताना विकासाच्या प्रगतीपथावरील समाजाचे चित्र डोळ्यासमोर असावे. त्याचबरोबर आजच्या युवांची स्थिती व त्यांच्या आकांक्षा यांना न्याय मिळावा, अशी आमची  अपेक्षा आहे. म्हणूनच समाजातील वेगवेगळ्या घटकांच्या सल्ल्याने युवा धोरण कसे असावे, याचा प्राथमिक मसुदा

शासनाकडे सुपूर्द करण्यात येत आहे. या युवा धोरण कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील युवांसोबत काम करणाऱ्या संस्था, संघटना, कार्यकर्ते, समाजशास्त्रज्ञ अशा विविध स्तरांतून आम्हाला सहकार्य लाभले आहे. त्या सर्व संस्था व व्यक्तींचे मी मनापासून आभार मानते.

युवा धोरण कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून शंभर युवा कार्यकर्त्यांचा चमू गेले सात महिने सतत कार्यरत आहे. युवा धोरणाचा प्रारंभिक मसुदा बनविताना महाराष्ट्रातील जवळपास तीस तज्ज्ञ मान्यवरांकडून विविध विषयांवर सूचना मागविण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये १९ कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. या कार्यशाळांमध्ये समाजाच्या विविध घटकांतील युवांनी आपला सहभाग नोंदविला. यात विद्यार्थी, गैरविद्यार्थी, शहरी, ग्रामीण, आदिवासी, दलित, अल्पसंख्यक, अपंग तसेच विविध वंचित घटकांतील युवांचा सहभाग राहील, याची काळजी घेतली गेली. या कार्यक्रमांमध्ये युवतींची उपस्थिती युवकांच्या बरोबरीने होती. या दरम्यान जवळपास २००० युवांनी आपली मते व प्रतिक्रिया लेखी स्वरूपात कळविल्या. त्यांचे आम्ही शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण केले. युवांनी मांडलेले मुद्दे आम्हाला खूप काही शिकवून गेले. या सर्वांना एकत्र करून एका सम्यक युवा धोरणाचा मसुदा बनविण्याचे काम युवा विकासाच्या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या तसेच युवांसोबत प्रत्यक्ष कामाचा अनुभव असणाऱ्या दहा जणांच्या गटाने केले.

हा मसुदा समाजामध्ये युवा धोरणाविषयी विचारमंथन सुरू करेल अशी आम्हाला आशा आहे. या मसुद्यासंदर्भात जनता, लोकप्रतिनिधी, प्रसारमाध्यमे, सामाजिक संस्था, संघटना यांनी विचार-विनिमय करून आपल्या प्रतिसाद व सूचना आम्हाला दि. २५ नोव्हेंबर ०९ पर्यंत कळवाव्यात असे आम्ही आवाहन करतो. युवा धोरणाचा हा मसुदा न बनता विचार-विनिमयाची संधी बनावी, अशी अपेक्षा आहे. दि. १२ जानेवारी २०१० रोजी राष्ट्रीय युवा दिनी एक सर्वंकष मसुदा माननीय मुख्यमंत्र्यांना सादर करून राज्याचे युवा धोरण आखण्याची मागणी आपण करणार आहोत. त्यासाठी सर्व मिळून मनापासून प्रयत्न करू या आणि नवमहाराष्ट्राच्या उभारणीसाठी कटिबद्ध होऊ या.

**सुप्रिया सुळे**

निमंत्रक तथा अध्यक्षा
(मसुदा समिती)

## अनुक्रम


१. प्रास्ताविक
२. धोरणाची गरज
३. युवा : व्याख्या
४. मूल्ये
५. युवांचे हक्क व अधिकार
६. युवांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या
७. शासन व समाजाची बांधीलकी
८. दृष्टी
९. ध्येय
१०. युवा धोरणाची उद्दिष्टे
११. युवांमधील प्राधान्य गट
१२. धोरणातील प्राधान्य
१३. शिक्षण
१४. प्रशिक्षण व कौशल्य विकास
१५. रोजगार व उपजीविका
१६. सामाजिक सुरक्षा
१७. आरोग्य व जीवनशैली
१८. पर्यावरण
१९. क्रीडा व विरंगुळा
२०. कला व संस्कृती
२१. विज्ञान व तंत्रज्ञान
२२. नागरिकत्व व सहभाग
२३. अंमलबजावणी यंत्रणा
२४. युवा धोरणाचे नियमन
२५. सनियंत्रण व मूल्यमापन
२६. आव्हाने
२७. आढावा
२८. परिशिष्टे (अ) - कृती आराखडा, (ब) - अंमलबजावणीची संरचना (क) कार्यकारी मसुदा समिती
२९. संदर्भसूची

## १. प्रास्ताविक

१.१ महाराष्ट्र राज्य हे युवांसाठी उत्तरदायी असून राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हे युवा धोरण सादर करण्यात येत आहे. आपला युवांवरील विश्वास व त्यांचे सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेविषयीचे धाडस, स्वतःला प्रश्न विचारण्याची तयारी व अशा एका समाजाकडे जाण्याचा संकल्प; ज्यात बहुविधता, लोकशाही, सुयोग्य राजसत्ता, लिंगसमभाव व सामाजिक न्याय हे त्या समाजाच्या रचनेचा[१] मुख्य आधार असतील. अशा सर्व संकल्पनांवर हे धोरण आधारलेले आहे. या धोरणाला मानवी अधिकारांच्या दृष्टिकोनाचे अधिष्ठान असून युवांच्या सर्वंकष सक्षमीकरणावर त्याचा भर आहे. [१]

१.२ हे सर्वसमावेशक असे धोरण असून या धोरणात लिंग, जात, वर्ग, धर्म, भाषा, सक्षमता यांच्यातील विविधता समाविष्ट असून शासनाला त्याच्या जबाबदारीविषयी हे धोरण असा पुनरुच्चार करते की, शासनाने या अतिशय प्रवाही व क्रियाशील अशा लोकसंख्या वर्गाकडे लक्ष देऊन या वर्गाच्या विशेष गरजा ओळखून त्यांची दखल घेणे, युवांच्या आकांक्षा व त्यांचे प्रश्न समोर आणणे, यांसारख्या आव्हानांकडे लक्ष दिले पाहिजे. या धोरणात *युवांकरिता* काम करण्यापेक्षा **युवांसोबत** काम करण्यावर अधिक भर दिलेला आहे.

## २. धोरणाची गरज

२.१ एकूण लोकसंख्येच्या ४०.६% एवढ्या प्रमाणात असलेल्या १३ ते ३५ वर्षे वयोगटातील युवांमुळे (जनगणना २००१) भारत हा देश 'तरुण' देश समजला जातो. सन २००३ मध्ये तयार करण्यात आलेल्या राष्ट्रीय युवा धोरणाने ज्या रीतीने युवा सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित करून आवश्यक त्या रचनात्मक सुधारणांच्या शिफारशी केल्या, त्यावरून या धोरणाचे महत्त्व राज्याने नेमके ओळखले असून त्या विषयी धोरणाने केलेल्या योगदानाचे महत्त्वही राज्य शासन मान्य करते. सन २००० पासून भारत सरकारने युवांच्या सक्षमीकरणासाठी विविध धोरणे राबविण्यास सुरुवात केली. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण (२०००), अकरावी पंचवार्षिक योजना (नियोजन मंडळ, २००६), शिक्षण धोरण (२००२), राष्ट्रीय किशोरावस्था पुनरुत्पादन व लैंगिक आरोग्य रणनीती (२००६) व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (२००५-२०१२) ही काही राष्ट्रीय स्तरावरील नियोजनाची उदाहरणे आहेत; ज्यात प्रामुख्याने युवा पिढी व त्यांच्या योगदानाविषयी विशेषत्वाने चर्चा करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाने आधीच महिला धोरण, औद्योगिक धोरण, शेती धोरण, सिंचन धोरण, रोजगार व स्वयंरोजगार धोरण व माहिती तंत्रज्ञान धोरण यांसारखी अनेकविध धोरणे

[१] राष्ट्रीय युवा धोरणाची समीक्षा (२००४), राष्ट्रीय युवा फाउंडेशन.

तयार केलेली आहेत. संख्येने सर्वाधिक असलेल्या युवा पिढीची दखल घेण्यासाठी तसेच या सर्व धोरणांशी युवांच्या मुद्द्यांची जाणीवपूर्वक सांगड घालण्याच्या हेतून या विविध धोरणांच्या अंमलबजावणीमध्ये युवा पिढीला जोडून घेणे आवश्यक आहे.

२.२ महाराष्ट्र राज्याची गणना देशातील प्रगत राज्यांमध्ये केली जाते. हे राज्य देशातील लोकसंख्येच्या तुलनेत सर्वात जास्त घनतेचे (९७ कोटी व सन २००१ च्या जनगणनेनुसार देशाच्या लोकसंख्येत ९% इतके असलेले) देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. सन २००७ पर्यंत या राज्याची एकूण लोकंसख्या सुमारे १०६ कोटी इतकी होईल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे (नोंदणी व जनगणना आयुक्त, २००६). सन २००१ मध्ये राज्याचा जननदर हजार पुरुषांमागे ९२२ महिला इतका होता. राज्यात सन २००१ मध्ये एकूण लोकसंख्येच्या ४२.४३% इतकी लोकसंख्या शहरी भागात वास्तव्यास होती; तर ५४.९६% इतकी श्रमशक्ती शेती व्यवसायामध्ये गुंतलेली होती. सन २००१ मध्ये मानव विकास निर्देशांकाबाबत महाराष्ट्र हे ०.५२३ इतके गुण मिळवून देशात चौथ्या क्रमांकावर होते. मात्र, जिल्हा स्तरावरील मानव विकास निर्देशांकाचे विश्लेषण करताना विदर्भ (नागपूर वगळता) व मराठवाड्याच्या मागासलेपणाला त्यात प्रामुख्याने अधोरेखित केलेले आहे. मुंबई शहर व उपनगरे, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व नागपूर हे जिल्हे राज्याच्या सरासरी मानव विकास निर्देशांकापेक्षा अधिक गुण असलेले जिल्हे होते. तर विदर्भ (नागपूर वगळता) व मराठवाड्यातील कोणत्याही जिल्ह्याने सरासरी निर्देशांकापेक्षा अधिक गुण मिळविले नाहीत (महाराष्ट्र शासन, २००२). देशातील एकूण औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा १९% इतका असून, सेवा क्षेत्रातील उत्पादनात १५% व देशाच्या ढोबळ विकास उत्पादनात १३% इतका वाटा आहे (महाराष्ट्र विकास अहवाल, २००७).

२.३ सन २००१ मध्ये महाराष्ट्रातील युवा पिढीची लोकसंख्या ४१,३४७,८२१ इतकी म्हणजेच राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ४२.६८% इतकी होती. युवा हा काही एक सामायिक गट नसून तो विविध विभागांनुसार (जसे शहरी, ग्रामीण व आदिवासी), निवाऱ्याच्या स्वरूपानुसार (घर असलेले व बेघर), आर्थिक वर्गानुसार (उच्च, मध्यम व गरीब), लिंगानुसार (महिला, पुरुष व अन्य लैंगिक प्राधान्य असलेले) व भूमिका (विद्यार्थी, शाळेत न जाणारे किंवा गळती झालेले, रोजगार असलेले, बेरोजगार, पालक, नागरिक) विभागला जातो. यापैकी युवा पिढीतील सर्वात मोठा भाग हा सामाजिकदृष्ट्या मागसलेला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने युवांच्या प्रश्नांची दखल घ्यायला भाग पाडले आहे.

२.४ महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस सुवर्ण महोत्सवी वर्षात स्वतंत्र युवा धोरणाची गरज पुढील कारणांसाठी विशेषत्वाने जाणवते :

२.४.१ युवा ही अवस्था जीवनातील सर्वात महत्त्वाची अवस्था असली तरी ती पूर्णपणे अस्थिरता, गोंधळ व आव्हानांनी भरलेली असते. सामाजिक मापदंडानुसार कुटुंब व सार्वजनिक जीवनातील निर्णय प्रक्रियांमध्ये युवांना नेहमी डावलले जाते.

२.४.२ शासनाने वेळोवेळी शिक्षण, रोजगार व सामाजिक न्याय यासारख्या धोरणांची निर्मिती करीत असताना युवांवर लक्ष केंद्रित केले असले तरीही त्यात युवावस्थेचा वेगळेपणाने विचार करून त्याचा आधार घेतलेला नाही.

२.४.३ युवांमध्ये उपजत असलेल्या वैविध्यपूर्ण निर्मितीक्षम ऊर्जा व कलागुणांना ना युवांनी स्वत: कधी पूर्णपणे ओळखले आहे; ना समाजाने त्याचा पूर्णत: वापर करून घेतला आहे. या सर्वांचा त्यांच्या व्यक्तिगत व समाजावरही विपरित परिणाम झालेला दिसून येतो. राज्याची विविध धोरणे तयार करीत असताना लोकसंख्येच्या जवळजवळ ४३% इतक्या असलेल्या युवा पिढीची दखल घेऊन त्यांना समाविष्ट केले तर ते समाजासाठी मोठे सामाजिक भांडवल तयार होईल.

२.४.४ युवांना प्राधान्य देत, विविध रणनीतींच्या माध्यमातून युवांच्या सक्षमीकरणाला दिशा देत तसेच युवांच्या विविध मुद्द्यांना व्यापक अंगाने समोर आणत कृती करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

## ३. युवा : व्याख्या

३.१ युवा ही जीवनातील एक अवस्था आहे, असे हे धोरण मानते. युवावस्थेच्या या स्थितीत युवांमध्ये केवळ शारीरिक व मानसशास्त्रीय बदल होत नाहीत; तर कुटुंब व सामाजिक जीवनातील त्यांच्या भूमिकेतही बदल घडतात. समाजातील भौगोलिक, लिंग, सामाजिक व सांस्कृतिक वैविध्यतेमुळे सर्वसहमतीची युवावस्थेची वयोमर्यादा ठरवून व्याख्या करणे खूप गुंतागुंतीचे बनते.

३.२ राष्ट्रीय युवा धोरण, २००३ मध्ये म्हटल्याप्रमाणे १३ ते ३५ वर्षे वयोगटात सामावली जाणारी सर्व लोकसंख्या जरी व्यापक युवा म्हणून ओळखली जात असली; तरी त्यात किशोरावस्था (वय १३ ते १९ वर्षे) व तरुण युवा (वय २० ते ३५ वर्षे) अशी दोन गटनिहाय वर्गवारी केलेली आहे.

३.४ किशोर व तरुण युवांना अधिक प्राधान्य दिले जायला हवे, असे राज्य युवा धोरण ठामपणे मांडते. आजच्या समाजातील रचनात्मक संस्थांमध्ये असलेल्या मागासलेपणावर मात करण्यासाठी ३० ते ३५ वर्षे

वयोगटातील युवा; जे आज कठीण परिस्थिती जीवन जगत आहेत, जे वंचित समूहातून आलेले असून शालेय शिक्षणातून गळती होऊन ज्यांची विकासाची पहिली संधी वाया गेली आहे, अशा समूहांनासुद्धा युवा म्हणून संबोधले पाहिजे, असे धोरण सुचवत आहे. तरीही ३० ते ३५ वर्षे वयोगटातील समूहांना 'युवा'च्या व्याख्येत समाविष्ट करण्याविषयी सविस्तर चर्चा करण्यात येऊन आढावा घेण्यात यावा.

## ४. मूल्ये

भारतीय घटनेने दिलेल्या मूल्यांना हे युवा धोरण पुन्हा एकदा अधोरेखित करते. युवा धोरणाचे मुख्य ध्येय युवांचे सक्षमीकरण हे असून त्यासाठी पुढील मूल्ये आवश्यक आहेत.

४.१ लिंगसमभाव : लिंग, लिंगभाव व लैंगिक प्राधान्य या विषयी भेद न करता स्थान व संधी उपलब्ध करणे.

४.२ युवांचा सहभाग : युवांशी व संपूर्ण समाजाशी संबंधित सर्व तऱ्हेच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रत्येक युवाला अधिकार आहे.

४.३ सर्वसमावेशकता : सर्व युवांना समान संधी तसेच सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या वंचित समूहांना सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे.

४.४ विविधतेचा आदर : सांस्कृतिक, आध्यात्मिक, भाषिक व धार्मिक विविधतेविषयीच्या आदराला विकासाचा मुख्य आधार बनविणे.

४.५ निरंतरता : पुढील पिढीच्या गरजा पूर्ण होण्याच्या क्षमतेचा ऱ्हास न करता निसर्गाशी जवळीक व बांधीलकी मानत निकोप व सुसंगत जीवनशैली तयार करणे.

४.६ उत्तरदायित्व : युवांप्रती समाजाची तसचे युवांची समाजाप्रती असलेली जबाबदारी व उत्तरदायित्वाची जाण निर्माण करणे.

## ५. युवांचे हक्क व अधिकार

हे धोरण मानवी अधिकारावर आधारलेले आहे आणि त्या अनुषंगाने पुढील महत्त्वाचे अधिकार आहेत.

५.१ देशाच्या नागरिकतेचा व भारताच्या राज्यघटनेने दिलेले मूलभूत अधिकार मिळविणे आणि ते प्रत्यक्ष अमलात आणण्याचा अधिकार.

५.२ निर्णय प्रक्रियेत तसेच स्वत:च्या व समाजाच्या विकासासाठी चालू विविध कार्यक्रम व उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचा अधिकार.

५.३ निकोप पर्यावरणाचा व दर्जेदार शिक्षण उपलब्ध होण्याचा आणि समान संधीचा अधिकार.

५.४ सन्माननीय जीवन जगण्यासाठी शाश्वत उपजीविकेचा अधिकार.

५.५ लोकशाही, स्वतंत्र विद्यार्थी तसेच अन्य जनसंघटना आणि सत्तेच्या यंत्रणांमध्ये संघटन बांधणी व सहभागाचा अधिकार.

५.६ स्वच्छ पर्यावरणात आरोग्यदायी जीवन जगण्याचा अधिकार.

५.७ लैंगिक व पुनरुत्पादन जीवनात निवडीचा अधिकार.

५.८ सर्व तऱ्हेच्या विषमता, हिंसा व शोषणापासून संरक्षण मिळण्याचा अधिकार.

## ६. युवांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

समाजाच्या विकासात युवा महत्त्वाची भूमिका निभावतात, हे जाणून युवांच्या अधिकारांसह त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत :

६.१ शांतता, संरक्षण व विकासाला वृद्धिंगत करणे.

६.२ सर्वांप्रती मानवी सन्मान व आदर वाढीस लावणे.

६.३ सर्व तऱ्हेच्या हिंसा, गुन्हे, विषमता व शोषणापासून मुक्त असलेल्या समाजाच्या उभारणीत योगदान देणे.

६.४ वैविध्यपूर्ण संस्कृती, भाषा, धर्म व राजकीय बांधीलकी यांचा स्वीकार व आदर करणे.

६.५ देश व राज्य सेवा, सामाजिक कार्य व स्वयंसेवी कार्य याद्वारे रचनात्मक विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होणे.

६.६ सार्वजनिक मालमत्ता व जनतेच्या संपत्तीचा आदर करून तिचे संरक्षण करणे.

६.७ पर्यावरणीय समतोलाविषयी संवेदनशील राहणे आणि त्यांचे संरक्षण व जतन करणे.

६.८ जबाबदार नागरिक बनणे.

## ७. शासन व समाजाची बांधीलकी

७.१ हे धोरण युवांच्या शारीरिक, भावनिक, सामाजिक व आध्यात्मिक उन्नतीप्रती देश व समाजाच्या असलेल्या बांधीलकीला अधोरेखित करते. समाजातील वयस्कर व्यक्ती या युवांसाठी आदर्श उभा करतील आणि सार्वजनिक जीवनातील त्यांचा सहभाग वाढवतील, अशी आशा हे धोरण करते. तसेच हा समाज युवांच्या सर्व क्षमता उपयोगात आणत त्यांचे ध्येय पूर्ण होण्यासाठीच्या प्रयत्नात त्यांना सर्वतोपरी सहकार्य तर

करेलच; पण याशिवाय आजच्या विकास प्रक्रियेतील एक क्रियाशील सहकारी नव्हे, तर भविष्यातील नेते म्हणून युवांकडे पाहण्याचे स्वप्न पाहील.

## ८. दृष्टी

८.१ हे युवा धोरण एका अशा समाजाचे स्वप्न पाहते, ज्यात युवा स्वावलंबी, सक्षम, समानता व सामाजिक न्याय या मूल्यांचा अंगीकार केलेले असतील आणि देश व समाजाच्या विकासातील स्वयंसेवक व त्यांचे पाईक म्हणून कटिबद्ध असतील.

## ९. ध्येय

९.१ युवांचे अधिकार, त्यांच्या क्षमता पूर्णत्वास नेण्यासाठी सुयोग्य वातावरण तयार करणे, ज्याद्वारे युवा हे उत्पादक, निरोगी व जबाबदार नागरिक बनून समानता व सामाजिक न्याय मूल्यांना उत्तरदायी राहत स्वत:च्या व समाजाच्या विकासात योगदान करू शकतील.

## १०. युवा धोरणाची उद्दिष्टे

१०.१ जात, धर्म, वंश, लिंग, भौगोलिक स्थान व क्षमता याविषयी कोणताही भेद बाळगता सर्व युवांना त्यांचे अधिकार व योजना उपलब्ध करून देणे.

१०.२ युवांना दर्जेदार शिक्षण, आरोग्य, उपजीविका, निवारा आणि छंद व विरंगुळा जोपासणारी केंद्र उपलब्ध करण्याची हमी देणे.

१०.३ युवांच्या निर्णय क्षमता, लोकशाहीत सहभाग, सारासार विचार प्रक्रिया तसेच नेतृत्व क्षमता वाढविणे.

१०.४ युवांच्या आशा, आकांक्षा, गरजांना पुढे आणण्यासाठी संधी निर्माण करून देणे.

१०.५ युवांमधील कमजोरपणा तसेच परिस्थितीला शरण जाण्याची प्रवृत्ती कमी करणे आणि संकटग्रस्त युवांना जीवनाची दुसरी संधी उपलब्ध करून देण्यासाठी सहाय्य यंत्रणा उपलब्ध करून देणे.

१०.६ राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय विकासकामांमध्ये नियोजन व निर्णय प्रक्रियांमध्ये युवांचा स्वयंसेवी सहभाग वाढविण्यासोबतच शासन आणि समाजाकडून राबविण्यात येणाऱ्या विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये त्यांचा सहभाग वाढविणे.

१०.७ युवांशी संबंधित विविध मुद्द्यांना समोर आणण्यासाठी एकात्मिक व बहुक्षेत्रीय समन्वय, सहाय्य यंत्रणा आणि प्रतिसाद यंत्रणा याविषयीच्या दृष्टिकोनात वाढ करणे.

## ११. युवांमधील प्राधान्य गट

हे धोरण युवा विषयक संकल्पनेत पुढील विशेष गटांना अधोरेखित करते.

११.१ महिला युवा

११.२ दुर्गम भागातील युवा

११.३ आदिवासी युवा

११.४ शहरी वस्त्या, झोपड्या, रस्ते यांवर राहणारा तसेच बेघर असलेला युवा

११.५ औपचारिक शालेय शिक्षणातून गळती होऊन बाहेर पडलेला युवा

११.६ विकलांग युवा

११.७ सामाजिकदृष्ट्या पूर्वग्रहांमुळे प्रभावित झालेला युवा (जसे समलिंगी, द्वैलिंगी व उभयलिंगी)

११.८ अतिशय कठीण परिस्थितीत जगणारा युवा जसे, मानवी तस्करीतील पीडित, गुन्हेगारीत ओढले गेलेले तरुण, किशोर आणि कायद्याच्या कचाट्यात सापडलेले तरुण वयस्क

## १२. धोरणातील प्राधान्य

युवांचे सक्षमीकरण ही बहुआयामी अशी प्रक्रिया आहे; जी युवांच्या जीवनातील वैविध्यांशी प्रत्यक्ष संबंधित आहे. म्हणून हे धोरण युवांशी संबंधित पुढील मुद्द्यांना प्रामुख्याने अधोरेखित करते.

- शिक्षण
- प्रशिक्षण व कौशल्य विकास
- उपजीविका
- सामाजिक संरक्षण
- आरोग्य व जीवनशैली
- पर्यावरण
- छंद व क्रीडा

- कला व संस्कृती
- विज्ञान व तंत्रज्ञान
- नागरिकता व सहभाग

## १३. शिक्षण

जीवन जगणे अधिक सुकर होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या शिक्षणासाठी कुटुंबासारख्या अनौपचारिक व्यवस्थेनंतर औपचारिक शिक्षण व्यवस्था हीच मुले व युवांच्या आयुष्यातील एक महत्त्वाची सामाजिक व्यवस्था आहे. महाराष्ट्रातील शिक्षणाचा स्तर हा भारताच्या तुलनेत वरचा आहे. तसेच पटनोंदणीतील लिंग विषमभावाचे प्रमाणही तुलनेने कमी आहे. शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशातील पाचवे आघाडीचे राज्य मानले जात असले तरीही राज्यात अशी शेकडो स्थलांतरित मजुरांची मुले व तरुण आहेत, ज्यांना औपचारिक शिक्षण व्यवस्था उपलब्ध होत नाही. प्राथमिक शिक्षणातील पटनोंदणी जरी जवळजवळ सर्वत्र दिसत असली तरी शाळा गळतीचे मोठे प्रमाण माध्यमिक व उच्च शिक्षणात जास्त दिसून येते. या धोरणातील अकराव्या विभागात दिलेले विविध सामाजिक समूह हे अजूनही माध्यमिक शिक्षणाच्या कक्षेबाहेर आहेत. हे धोरण या समूहांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध होण्याविषयी काही मार्गदर्शक सूचना करते.

**धोरण मार्गदर्शक तत्त्वे**

१३.१ राज्यातील सर्व स्तरांतील मुले-मुली व युवा यांना भारतीय घटनेने प्रदान केलेला शिक्षणाचा मूलभूत अधिकार प्राप्त होईल, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना आखणे.

१३.२ माध्यमिक व उच्च शिक्षणात होणारी मोठ्या प्रमाणातील मुलांची गळती रोखण्यासाठी शासनाने माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या उपलब्धतेवर जास्त भर दिला पाहिजे.

१३.३ शासनाने सर्वात वंचित व गरीब समाज समूहापर्यंत पोहोचण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत आणि त्यांना शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण, वसतिगृह, सुविधा आदी माध्यमांतून दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे. शासनाने वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करावी, अशी शिफारस हे धोरण करते. विकलांग मुला-मुलींना व युवांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी शासनाने हमी दिली पाहिजे.

१३.४ काही कारणांनी आपले शिक्षण पूर्ण न करू शकलेल्या युवांना पुन्हा शिकण्यासाठी शासनाने दुसऱ्यांदा संधी प्राप्त करून दिली पाहिजे.

१३.५ उच्च शिक्षणासाठी शासनाने युवांसाठी विविध प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले पाहिजेत.

१३.६ शालेय शिक्षणाबाहेर फेकल्या गेलेल्या युवांसाठी शासनाने अनौपचारिक शिक्षण कार्यक्रम उपलब्ध करावेत आणि त्याद्वारे त्यांना औपचारिक शिक्षण व्यवस्थेत पुन्हा प्रवेश मिळण्यासाठीच्या संधी सुनिश्चित केल्या पाहिजेत.

१३.७ शासनाने माहिती व संपर्कातील प्रगत तंत्रज्ञानाला शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ट करून ते अभ्यासक्रम शालेय व शाळाबाह्य युवांना उपलब्ध करून देण्याची हमी दिली पाहिजे.

१३.८ शिक्षण संशोधन व प्रशिक्षण राज्य मंडळ यांसारख्या अन्य संस्थांनी शिक्षणाच्या सर्व स्तरांतील अभ्यासक्रमांचा आढावा घेऊन ते अद्ययावत केले पाहिजेत. अभ्यासक्रमातील हा बदल आजूबाजूच्या परिस्थितीत होत असलेला बदल, मूल्यसंवर्धन व युवांच्या गरजा लक्षात घेऊन करण्यात यावा.

१३.९ शैक्षणिक अभ्यासक्रम हे वैज्ञानिक तत्त्वे अनुभवाधारित शिक्षण, पर्यावरण विषयक जागरूकता, विविध व्यावसायिक प्रवाह व पारंपरिक ज्ञान व्यवस्थेचा आदर करण्यास प्रवृत्त करते. या विषयी शासनाने योग्य ती काळजी घ्यावी.

१३.१० शासनाने शाळा व महाविद्यालये यांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणात लैंगिक शिक्षणासारख्या जीवनकौशल्य शिक्षणाचा औपचारिक अभ्यासक्रम म्हणून अंतर्भाव करावा.

१३.११ शासनाने राज्यात असलेल्या विविध शैक्षणिक व्यवस्था व पद्धती यात समतोल ठेवण्याची हमी दिली पाहिजे.

१३.१२ उच्च शिक्षणाचा दर्जा व त्यासाठीच्या शैक्षणिक संस्थांची संख्या निर्धारित करण्यासाठी आणि त्यांचे नियंत्रण करण्यासाठी शासनाने सर्वोच्च सनियंत्रण संस्था स्थापन करण्यावर भर दिला पाहिजे.

१३.१३ सुयोग्य प्रशिक्षणाद्वारे दर्जेदार शिक्षकांच्या नियुक्तीवर शासनाने भर दिला पाहिजे; जेणेकरून हे शिक्षक त्या-त्या विषयातील तज्ज्ञ न राहता, शिक्षणाचा व्यापक हेतू व युवांच्या गरजा लक्षात घेऊन शैक्षणिक अभ्यासक्रम तयार करण्यातही तज्ज्ञ बनतील, याची खात्री शासनाने दिली पाहिजे.

१३.१४ खाजगी कोचिंग क्लासेस चालविणाऱ्या संस्थांचे सनियंत्रण करण्यासाठी शासनाने नवीन मापके व सनियंत्रण यंत्रणा विकसित केल्या पाहिजेत.

१३.१५ प्रत्येक शालेय संस्था कायद्याने सुनिश्चित केल्याप्रमाणे लैंगिक अत्याचार विरोधी समिती तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समिती गठित करेल, याची हमी शासनाने दिली पाहिजे. तसेच व्यक्तिगत

समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीही या प्रत्येक संस्थेत स्थापन करण्याची शिफारस हे धोरण करीत आहे.

१३.१६ शासनाने कडक नियंत्रण पद्धती तयार करून रॅगिंग, छेडछाड व अत्याचारासंदर्भात कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे, अशी शिफारस हे धोरण करीत आहे.

## १४. प्रशिक्षण व कौशल्य विकास

सद्यःस्थितीत पारंपरिक शिक्षण हे केवळ माहिती व ज्ञानवर्धित असून व्यक्तिमत्त्व आणि व्यावसायिक कौशल्य विकासासाठी उपयुक्त ठरत नाही. असेही दिसून येते की, संभाव्य व्यवसायाचे मार्ग, शिक्षण व्यवस्था आणि संभाव्य उपजीविकेचे साधन यांची सांगड घातली जात नाही. त्याचबरोबर, या शिक्षण व्यवस्थेत एका व्यवसायातून दुसऱ्या भिन्न व्यवसायाची निवड करणे अवघड होऊन जाते. आधुनिक जागतिकीकरणाच्या काळात विशिष्ट तांत्रिक कौशल्यांव्यतिरिक्त व्यवस्थापकीय कौशल्ये, बहुस्पर्शी कौशल्ये, संवाद कौशल्ये, समन्वय कौशल्ये आणि व्यक्तिसापेक्ष नेतृत्व कौशल्य या घटकांचे सार्वत्रिक प्रशिक्षण घेणे आवश्यक झाले आहे. म्हणून युवा वर्गासाठी पारंपरिक शिक्षण प्रणालीव्यतिरिक्त अपारंपरिक आधुनिक व्यक्तिमत्त्व सक्षमीकरणावर भर देणारे विशेष प्रशिक्षण प्रणाली प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

**धोरणाची दिशादर्शक तत्त्वे**

१४.१. पारंपरिक शिक्षणप्राप्त असलेले किंवा नसलेले अशा दोन्ही युवा वर्गाला व्यक्तिमत्त्व सक्षमीकरणाचे विशेष प्रशिक्षण निरंतर उपलब्ध राहील, यासाठी तशी संधी निर्माण करणारी प्रणाली शासनाने प्रस्थापित करावी.

१४.२. ही विशेष कौशल्य विकास प्रशिक्षण प्रणाली यशस्वीपणे राबविण्यासाठी राज्य शासन एक स्वतंत्र महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था प्रस्थापित करावी. ही संस्था शासकीय असेल आणि या संस्थेचे कार्य राष्ट्रीय कौशल्य विकास संस्था व राष्ट्रीय ज्ञान आयोग या दोन संस्थांशी जोडले जावे.

१४.३. सदर प्रशिक्षण संस्थेत सर्वव्यापी व मूलभूत कौशल्य प्रशिक्षणाचा समावेश असावा; जो सर्व प्रकारच्या व्यावसायिकांना सक्षम करेल. तांत्रिक, अतांत्रिक, व्यवस्थापकीय व स्वतंत्र व्यावसायिक अशा सर्व वर्गातील युवांसाठी हे मूलभूत प्रशिक्षण उपयोगी ठरेल.

१४.४. सध्या अस्तित्वात असलेल्या आय.टी.आय., जिल्हा औद्योगिक केंद्र, महाराष्ट्र व्यवसाय विकास केंद्र या संस्थांची पुनर्बांधणी करून या संस्थांमधून उद्योग जगतात सद्यःस्थितीतील ‘बाजारमूल्य’ लक्षात घेऊन नवीन प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करणे आवश्यक राहील. ही पुनर्बांधणी शासन व खाजगी संस्था यांच्या संयुक्त

भागीदारीतून व्हावी. जेणेकरून खाजगी क्षेत्रातील व्यवसाय कौशल्याची निकड लक्षात घेऊन त्यानुसार कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करता येतील.

१४.५. उपरोल्लेखित युवा वर्गीकरणास अनुसरून प्रशिक्षण घेणाऱ्या युवा विद्यार्थ्यांना योग्य भत्ता मिळणे महत्त्वाचे आहे, अशी धोरणात्मक शिफारस आहे.

१४.६. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम शिक्षित, अशिक्षित युवा, विकलांग युवा या सर्वांना उपयुक्त ठरेल, असे असावे.

१४.७. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम उपक्रमाची गुणवत्ता टिकविणे अपरिहार्य असावे आणि प्रशिक्षणाची उद्दिष्टे स्पष्ट व शास्त्रीय कसोटीवर मूल्यमापन करण्याजोगी असावीत.

१४.८. प्रशिक्षण उपक्रम शक्य तिथे विकेंद्रित असावेत. त्यामुळे स्थानिक गरजांना प्राधान्य देणे शक्य होईल.

१४.९. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना शासनाने यथायोग्य पुरस्कृत करावे.

१४.१०. शासकीय कौशल्य विकास संस्थेतून यशस्वी प्रशिक्षणार्थींना सर्व शासकीय/निमशासकीय, खाजगी संस्थांमध्ये मान्यता असावी. तसेच स्वतंत्र व्यवसाय करू इच्छिणाऱ्या युवांना बँकेकडून व आर्थिक साहाय्य करणाऱ्या संस्थांनी भांडवली कर्ज उभारणीस मान्यता द्यावी. यासाठी शासनाने नवीन मार्गदर्शक तत्त्वे/नियमावली पारित करावी.

१४.११. प्रशिक्षित युवांची माहिती, गोषवारा, यादी जिल्हा व राज्य स्तरावर आरेखित केली जाईल आणि प्रशिक्षितांची यादी शासनाच्या संकेतस्थळी उपलब्ध असावी. जेणेकरून त्याचा विनियोग प्रशिक्षित उमेदवाराच्या शोधात असणाऱ्या संस्थांना करता येईल.

१४.१२. आधुनिक काळातील जागतिक स्तरावर असलेल्या व्यवसायांचे बदलते स्वरूप लक्षात घेऊन नवीन प्रशिक्षण कार्यक्रम विशेषत: महिलांसाठी तयार केले जावेत.

१४.१३. सर्व प्रशिक्षण उपक्रमांचे अंतिम उद्दिष्ट हे युवा पिढीला स्वयंनियोजन करण्याला वाव देणारे असावे. स्वत्व, संवाद कौशल्य, वाटाघाटीचे कौशल्य, भावनात्मक चातुर्य, जीवनमूल्याबद्दल आस्था, नेतृत्व अशा गुणांना विकसित करणारे असावे.

## १५. रोजगार व उपजीविका

शासनाचे कर्तव्य फक्त युवांसाठी रोजगार व उपजीविकेसाठी संधी निर्माण करणे एवढेच नसून युवांनी ती संधी घेण्यासाठी क्षमता विकसित होतील, अशी पूरक परिस्थिती तयार करणे हेदेखील आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल

कुटुंबातील मुलांना बालकामगार म्हणून काम करावे लागू नये, ही शासनाची जबाबदारी आहे. युवांचे कौशल्य व क्षमता विकास आणि पतपुरवठा यांची समान संधी असणे यासाठी महाराष्ट्र शासन सदैव प्रयत्न करीत राहील.

**धोरण मार्गदर्शक तत्त्वे**

१५.१. शासनाने महाराष्ट्र राज्य युवा उपजीविका पंचवार्षिक कृती आराखडा तयार केला पाहिजे. हा कृती आराखडा तयार करण्यासाठी एक विशेष कृतीदल नेमले पाहिजे. झालेल्या कामाचे मूल्यांकन व कार्यक्षमता पडताळून हा पंचवार्षिक कृती आराखडा तयार केला गेला पाहिजे.

१५.२. सध्या कार्यरत असलेल्या रोजगार नोंदणी कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेऊन पुढील कार्याची दिशा ठरविण्यासाठी शिफारशी केल्या गेल्या पाहिजेत. जेणेकरून जास्तीतजास्त युवांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

१५.३. रोजगार व स्वयंरोजगारासाठी सध्या कार्यरत असलेल्या विविध खात्यांमधील योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी *रोजगार व स्वयंरोजगार* या एकाच मंत्रालयाच्या माध्यमातून, ‘एक खिडकी योजने’च्या धर्तीवर झाली पाहिजे. यामुळे युवांना विविध योजनांचा लाभ घेणे सोयीस्कर होईल.

१५.४. शासनाने समाजातील गरजा ओळखून त्यांच्या पूर्ततेकरिता युवांसाठी रोजगाराच्या नेमक्या संधी निर्माण केल्या पाहिजे.

१५.५. शासनाने स्थानिक पातळीवरील रोजगार निर्मितीच्या संभाव्य संधी लक्षात घेऊन त्या संधीचा युवांनी फायदा घेण्यासाठी शासनाने पूरक वातावरण निर्माण करून दिले पाहिजे. तंत्रज्ञानातील प्रगतीचा वापर करून स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होईल, असे प्रयत्न शासनाने केले पाहिजेत. ही रोजगाराची संधी निर्माण करण्यासाठी खाजगी क्षेत्रालाही शासनाने सहभागी करून घ्यावे.

१५.६. शासनाने सर्व क्षेत्रामध्ये प्रत्येक कामाविषयी श्रमप्रतिष्ठा निर्माण केली पाहिजे आणि सर्व युवांना योग्य वेतन मिळेल याची दक्षता घेतली पाहिजे. या संदर्भात भारत सरकारने सूचित केल्याप्रमाणे किमान वेतन कायद्यामध्ये योग्य तो बदल केला पाहिजे. शासनाने ठरावीक कालावधीनंतर किमान वेतन दरामध्ये महागाई निर्देशांकानुसार योग्य तो बदल केला पाहिजे.

१५.७. शेती, उद्योग व सेवा क्षेत्रामधील कौशल्यांची गरज व सध्या असलेले अभ्यासक्रम लक्षात घेऊन युवांमध्ये ज्या क्षमतांची त्रुटी आहे, त्या शोधून काढण्याकरिता शासनाने विशेष कृती दल गठित केला पाहिजे. विशेषत: सेवा क्षेत्रामध्ये जी कौशल्ये लागतात, त्या संदर्भातील त्रुटी अभ्यासाव्यात.

१५.८. शासनाने युवांसाठी कमवा व शिका हे धोरण अवलंबिले पाहिजे आणि ज्या युवांना या अनुषंगाने शिक्षण घेताना रोजगार करण्याची इच्छा आहे, अशा युवांना प्रोत्साहित केले पाहिजे. यासाठी शासनाने युवांसाठी योग्य त्या संधी निर्माण कराव्यात आणि विद्यापीठांना अभ्यासक्रमांमध्ये बदल करण्यास सुचविण्यात यावे.

१५.९. युवांना वित्तीय संस्थांकडून स्वयंरोजगार निर्मितीसाठी लागणारा पतपुरवठा सुलभ पद्धतीने मिळण्यासाठी शासनाने योग्य प्रयत्न करावेत. महाराष्ट्र राज्य कौशल्य प्रशिक्षण संस्थेमधून ज्या युवांनी अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, त्यांना पतपुरवठ्यासाठी प्राधान्य दिले गेले पाहिजे. युवांना लघुवित्तपुरवठा होण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

१५.१०. सध्या असंघटित क्षेत्रात कमी कौशल्य, कमी वेतन मिळणाऱ्या अस्थायी रोजगारात वाढ झालेली आहे. हे सर्व रोजगार नियंत्रित व संघटित क्षेत्रात येतील, यासाठी शासनाने प्रयत्न करावेत आणि तोपर्यंत असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या युवांसाठी विशेष तरतुदी कराव्यात.

१५.११. रोजगार बदलण्यासाठी युवांमध्ये लागणाऱ्या क्षमतांचा विकास शासनाने केला पाहिजे.

१५.१२. शासनाने व्यवसाय समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र तालुका पातळीवर सुरू करावे. सेवाभावी संस्थांना या कामामध्ये सहभागी करावे आणि असे केंद्र चालविण्याकरिता मदत करावी.

१५.१३. हे धोरण महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रावर असलेले संकट ओळखून आहे. या संकटावर मात करण्यासाठी शेती व पूरक व्यवसाय चांगले उत्पन्न देणारे ठरू शकतात. असे व्यवसाय सुरू करण्यासाठी शासनाने युवांना प्रोत्साहित केले पाहिजे. कृषीआधारित प्रक्रियाउद्योग, साठवण व्यवस्था, दळणवळण व कृषिपर्यटन यांसारख्या व्यवसायांमध्ये युवांना रोजगार व स्वयंरोजगार निर्माण होण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत.

१५.१४. पीक पद्धती, शेतीचे तंत्र व अवजारे यामधील सुधारणा तसेच सेंद्रीय, नैसर्गिक व वैज्ञानिक शेतीमधील वाढ यासाठी विभागीय पातळीवर कृषी संशोधन केंद्र स्थापन करावे.

१५.१५. कोरडवाहू शेती करणाऱ्या युवांना शासनाने आर्थिक किंवा वस्तू रूपाने मदत दरवर्षी केली पाहिजे. जेणेकरून शेतीतून किमान उदरनिर्वाह भागेल आणि युवा वर्ग कृषी व्यवसायापासून दुरावला जाणार नाही.

१५.१६. हे धोरण युवतींनी घरकामातून कुटुंबाच्या उत्पन्नात केलेले योगदान लक्षात घेऊन अशी शिफारस करते की, एक विशेष समिती गठित करण्यात यावी, जी युवतींचे कौटुंबिक उत्पन्नातील योगदान आणि मालमत्ता व अधिकारासंदर्भात स्त्री-पुरुषांचा समान वाटा या संदर्भात अभ्यास करून शिफारशी करेल.

१५.१७. अकराव्या प्रकरणातील युवा संकल्पनेतील प्राधान्यक्रम असलेल्या युवांना रोजगार निर्मितीमध्ये सकारात्मक कृतींच्या माध्यमातून विशेष संधी देण्यात यावी.

१५.१८. हे धोरण महाराष्ट्र राज्याने रोजगार हमी योजना अमलात आणण्याकरिता गेल्या तीन दशकांपासून केलेले उल्लेखनीय प्रयत्न जाणते आणि अशी शिफारस करते की, शहरांतील युवांकरिता रोजगाराची हमी कशी निर्माण करता येईल, याची शासनाने पडताळणी करावी.

१५.१९. शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी योजनेमध्ये ग्रामीण जनतेचा सहभाग वाढविणे, कामाचे नियोजन, सहनियंत्रण व पूर्ण झालेल्या कामांचे सामाजिक लेखापरीक्षण करण्यासाठी युवांकरिता नेमकी भूमिका व जबाबदाऱ्या स्पष्ट कराव्यात.

१५.२०. सर्व कार्यालयांमध्ये विकलांग युवांना सहज संचार करता येईल, यासाठी शासनाने विशेष उपाययोजना कराव्यात.

१५.२१. नगर रचनेच्या प्रक्रियेमध्ये स्वयंरोजगार करणाऱ्या युवांसाठी वाणिज्य विभागामध्ये शासनाने ठरावीक क्षेत्र आरक्षित करावे.

१५.२२. युवांच्या स्वयंसहायता गटांना वस्तू व सेवांचे उत्पादन व विपणन सहकारी तत्त्वावर करण्याकरिता शासनाने प्रोत्साहित करून मदत करावी. या संदर्भात शासनाने खाजगी क्षेत्रासोबत समन्वय साधावा.

## १६. सामाजिक सुरक्षा

समाजातील उपेक्षित वर्ग, विशेषत: युवा वर्ग विकासाच्या संधीपासून उपेक्षित आहे. म्हणून शासनाचे हे कर्तव्य आहे की, सध्या असलेले व्यवस्थेतील व समाजातील त्रुटी सुधारणे आणि सुरक्षा कवच निर्माण करणे. युवांमधील वैफल्य व असंतोष यांची मुख्य कारणे दिशा व संधी नसणे आणि समाजाने दखल न घेणे ही आहेत, असे अनेक संशोधनांतून हे पुढे आले आहे. उपेक्षित असल्याचे दुष्परिणाम खोडून काढण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे.

### धोरण मार्गदर्शक तत्त्वे

१६.१ शासनाने युवांच्या स्थलांतराचे (राज्यात येणारे, राज्यातून बाहेर जाणारे व राज्याच्या अंतर्गत) प्रारूप नियमितपणे अभ्यासावे आणि त्या अनुषंगाने वेगवेगळ्या योजना आखाव्यात.

१६.२ भारत सरकारच्या प्रस्तावित सामाजिक सुरक्षितता विधेयकानुसार ९२% कामगार असंघटित क्षेत्रात काम करतात. यातील असंघटित युवा कामगारांकरिता हे धोरण खालील शिफारशी करीत आहे.

६.२.१ असंघटित क्षेत्रातील युवा कामगारांसाठी सुरक्षितता कवच उभे करण्यात यावे. उदा. भविष्यनिर्वाह निधी, प्रसुतीकालीन रजा, अपघाती अर्थसाहाय्य. या सर्व कामगारांना कामगार कल्याण कायद्याच्या अंतर्गत असलेल्या सर्व तरतुदी लागू करण्यात याव्यात.

६.२.२ असंघटित क्षेत्रातील युवांना ओळखपत्र देण्यात यावे. भारत सरकारने सध्या हाती घेतलेल्या विशेष ओळखपत्रामध्ये (युनिक आयडेंटिफिकेशन प्रोग्राम) हा ओळखपत्राचा भाग सामील करून घ्यावा.

६.२.३ असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व कामगारांना मूलभूत सुविधा कामाच्या ठिकाणी व ज्या ठिकाणी काम मागण्याकरिता जमतात, त्या ठिकाणी देण्यात याव्यात. या मूलभूत सुविधा देण्याची जबाबदारी काम देणाऱ्या कंत्राटदाराची किंवा संस्थेची आहे. तरीपण या जबाबदाऱ्यांची पूर्तता होते की नाही, हे पाहणे शासनाचे कर्तव्य आहे. गरज पडल्यास शासनाने यासाठी विशेष कर लावून निधी उभा करावा.

१६.३ स्थानिक स्वराज्य संस्थांनी युवांच्या सामाजिक सुरक्षेकरिता विशेष भूमिका निभावली पाहिजे. ही भूमिका निभावण्याकरिता युवा सामाजिक सुरक्षितता निधी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक स्तरावर निर्माण करावा. युवांनी, शासनाने, काम देणाऱ्या संस्था किंवा कंत्राटदारांनी या निधीमध्ये योगदान दिले पाहिजे. या निधीचा वापर युवांकरिता (व त्यांच्यावर अवलंबित असलेल्या व्यक्ती) आरोग्याचा विमा उतरविण्याकरिता झाला पाहिजे. शासनाने युवा आरोग्य विमा योजना ही राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना किंवा समुदाय आधारित विमा योजनेच्या धर्तीवर सुरू करावी.

१६.४ शासनाने युवांचे कामाच्या ठिकाणी होणारे शारीरिक, मानसिक व लैंगिक शोषण होऊ नये यासाठी संरक्षण द्यावे.

१६.५ व्यावसायिक क्षेत्रात काम करताना शास्त्रीय कसोटीवर मान्यताप्राप्त कार्यरचना व संरक्षण या गोष्टी अनिवार्य असाव्यात, याची धोरण शिफारस करीत आहे.

१६.६ युवा कामगारांच्या सामाजिक आयुष्याच्या समतोलासाठी आठवड्यातून एक सुटी, राष्ट्रीय सण व उत्सवाच्या सुट्या व विरंगुळ्यासाठी पुरेसा वेळ देण्याची शासनाने धोरणात तरतूद करावी.

१६.७ शासनाने बेरोजगार युवांची सामाजिक सुरक्षितता कशी असावी, हे ठरविण्यासाठी एक कृती दल स्थापन करावा.

१६.८ सर्व जातीधर्मांतील युवांमध्ये सामाजिक ऐक्य निर्माण होण्यासाठी शासन व समाजाने पूरक व पोषक वातावरण तयार करावे. यासाठी शासनाने युवांमध्ये स्व-जाणीव व परिसराविषयी बांधीलकी निर्माण होण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

१६.९ दोन पिढ्यांतील अंतर व गैरसमज कमी करण्यासाठी शासनाने विशेष उपक्रम राबवावेत. सेवाभावी संस्थांनी याकामी ठोस भूमिका बजावण्याकरिता त्यांना शासनाने प्रोत्साहन देऊन मदत केली पाहिजे.

१६.१० शासनाने गरजेप्रमाणे विद्यार्थी व युवा कामगारांसाठी वसतिगृहांची निर्मिती व त्यांचे व्यावसायिक तत्त्वावर व्यवस्थापन करावे. जेणेकरून तात्कालिक निवासाची सोय उपलब्ध होईल.

१६.११ संभाव्य नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचा धोका असणाऱ्या युवांना त्या आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी लागणाऱ्या सामाजिक सुरक्षिततेसाठीची तरतूद शासनाने करावी.

१६.१२ बदलत्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीमुळे जे पारंपरिक उद्योग-व्यवसाय नामशेष होत आहेत, त्या उद्योग-व्यवसायांना शासनाने मदत करावी आणि या बदललेल्या परिस्थितीमध्ये त्यांना समायोजन करता येईल, यासाठी उपाययोजना कराव्यात.

## १७. आरोग्य व जीवनशैली

आरोग्य हे संपूर्ण शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक संतुलनाची अवस्था आहे. रोग नसणे म्हणजे निरोगी असल्याचे लक्षण समजले जात नाही. किंबहुना आरोग्य संवर्धन ही एक निरंतर प्रक्रिया असून रोगप्रतिबंधात्मक जबाबदारीची जाणीव असलेली जीवनशैलीचे प्रतीक आहे. त्यामुळे आरोग्याची व्याख्या ही सर्वसमावेशक आहे. गुणवत्तापूर्ण जीवन जगणे हे उद्दिष्ट प्रत्येक व्यक्तीने स्वीकारावे, असा महत्त्वपूर्ण संदेश या आरोग्याच्या व्याख्येत आहे. या संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर युवा वर्गाच्या वैशिष्ट्यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरेल. उत्साह, अधिरता, मानसिक अस्थिरता, जोखीम पत्करण्याची वृत्ती या स्वभाव घटकांमुळे युवा वर्ग अनाहुतपणे रोगराईला बळी पडू शकतो. आरोग्य हे समाज विकासाचे साधन आहे. त्यामुळे सुदृढ युवक, युवती समाज विकासासाठी आवश्यक आहेत. या अनुषंगाने युवा धोरणात आरोग्याचा महत्त्वपूर्ण विनियोग समाविष्ट केला पाहिजे. यासाठी आरोग्य सेवा सर्वव्यापी असणे आवश्यक आहे. इतर विकास क्षेत्राशी समन्वय, युवा सहभाग व लोकोपयोगी तंत्रज्ञान हे घटक आरोग्य सेवा, युवा पिढीच्या गरजांनुसार विकसित करण्यात महत्त्वाचे ठरतात.

### धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

१७.१. आरोग्य सेवेची रचना, कार्य, उद्दिष्टे व उपक्रम युवा वर्गाच्या गरजांवर आधारित असली पाहिजेत आणि किशोरी/युवतींच्या विशेष गरजांबाबत संवेदनशील असले पाहिजे.

१७.२. आरोग्य सेवा क्षेत्रात युवकांसाठी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याची संधी मिळावी. आरोग्य संदेश वाहक, आरोग्य सेवक, सेविका, समवयस्क समुपदेशक, समन्वय कार्यकर्ता इत्यादी पदांवर युवा वर्गाला सहभागी करून घ्यायला वाव आहे.

१७.३. किमान पात्रतेचे निकष लावून आरोग्य संरक्षक दल निर्माण करून युवांना साथ रोगाचे नियंत्रण, आपत्तीकालीन व्यवस्थापन, पाण्याचे निर्जंतुकीकरण इत्यादीबाबत प्रशिक्षण दिले जावे आणि आपत्कालीन परिस्थिती या दलाचा विनियोग केला जावा.

१७.४. आरोग्य उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवकांसाठी विशेष पुरस्कार दिले जावेत.

१७.५. वैद्यकीय चिकित्सा व उपचाराच्या इतर शाखा- आयुर्वेद, होमियोपॅथी, युनानी, सिद्धा यांचा यथोचित उपयोग राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात व्हावा. या कार्यात युवांचा सहभाग रोजगार निर्मितीसाठी सहाय्यभूत ठरेल.

१७.६. युवकांना केंद्रस्थानी ठेवून राज्यात आरोग्य गणना व्हावी. यामुळे युवा वर्गात प्रामुख्याने आढळणाऱ्या रोगांचा, जोखीम पत्करण्याच्या वृत्तीचा आलेख मिळू शकेल. तसेच आरोग्य उपक्रमाचे नियोजन वास्तववादी होण्यास कारणीभूत ठरेल.

१७.७. युवकांसाठी त्यांच्या गरजांनुसार विशेष आरोग्य हस्तक्षेप प्रकल्प राबविले जावेत. उदा.- १५ ते १९ वर्षे व २० ते ३५ वर्षे वयोगटांतील युवांच्या गरजा वेगळ्या आहेत. त्यासाठी दोन वेगळे कार्यक्रम नियोजित करावे लागतील.

१७.८. प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रांमधून युवकांसाठी रोगप्रतिबंधात्मक आरोग्य शिबिरे, जीवन शिक्षण, जीवन कौशल्य प्रशिक्षण आयोजित केली जावीत.

१७.९. लैंगिक व प्रजनन प्रक्रियेशी निगडित स्त्रियांच्या आरोग्य समस्यांच्या निराकरणाविषयीच्या मानवी हक्कांचे संरक्षण होईल, याबाबत शासन दक्ष असेल. कुटुंब, विवाह, प्रजोत्पादन, मुलांची संख्या, गर्भपात इत्यादी विषयांवरील निर्णय प्रक्रियेत युवतींचा सक्रिय सहभाग असावा. यासाठी शासनाने योग्य प्रणाली निर्माण करावी.

१७.१०. युवांच्या विशेषतः किशोरी, युवतींच्या पंडू रोग, लोहक्षय व कुपोषणाशी निगडित समस्यांविषयी संशोधन होऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी शासनाने विशेष उपक्रम राबवावेत. त्यासाठी सार्वजनिक अन्नधान्य वितरण प्रणालीचे सबलीकरण करणे आवश्यक आहे.

१७.११. प्राथमिक आरोग्य केंद्रातून आरोग्यविषयक समुपदेशन कक्ष असावा. तसेच जेथे शक्य असेल, तेथे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून समुपदेशन संगणकाच्या माध्यमातून उपलब्ध व्हावे. तसेच, अंमली पदार्थांचे सेवन, व्यसनाधीनता या समस्यांसाठी सामाजिक पुनर्वसन केंद्र जिल्हा, तालुका स्तरावर निर्माण करावीत.

१७.१२. शालेय, महाविद्यालयीन शिक्षकांना प्रशिक्षित करून त्यांना रोगांची प्राथमिक लक्षणे ओळखण्याची कौशल्य, अभ्यास कौशल्ये, एकाग्रता तसेच नकारात्मक वृत्ती, आत्महत्येच्या विचारांची लक्षणे, वैफल्य ओळखणे इत्यादी महत्त्वपूर्ण समस्यांमध्ये सहभाग घेतला जावा.

१७.१३. कुटुंब कल्याण व लोकसंख्या शिक्षण उपक्रम राबवून, विवाह विहित कायदेशीर वयाच्या पुढे लांबविल्यास अथवा गर्भधारणा होण्यास विलंब केला. तर यासाठी प्रोत्साहनपर आर्थिक पुरस्कारांचा शासनाने सकारात्मक विचार करावा.

## १८. पर्यावरण

पर्यावरणाचा होणारा ऱ्हास ही युवांपुढील मोठी समस्या आहे. पर्यावरणाचे संतुलन राखणे आणि त्याची जोपासना करणे आताच्या व भावी पिढ्यांसाठी उपयोगी ठरेल. पर्यावरणाच्या संवर्धनामध्ये युवांचा सहभाग वाढविण्यासाठी संधी निर्माण केली गेली पाहिजे. शासनाने अशी धोरणे अवलंबावी जेणेकरून युवांचा व समाजाचा पर्यावरण संवर्धनामध्ये मोठा हातभार लागेल.

**धोरण मार्गदर्शक तत्त्वे**

१८.१. युवांना स्थानिक पातळीवर शाळा व महाविद्यालयांमध्ये निसर्ग मंडळे स्थापन करण्याकरिता जागरूक करण्यात यावे. या निसर्ग मंडळांच्या माध्यमातून पर्यावरणाचे संवर्धन करण्यात यावे.

१८.२. शासनाने पर्यावरणावर काम करणाऱ्या युवा गटांना व सेवाभावी संस्थांना पर्यावरण संवर्धनाच्या नियोजन व धोरण प्रक्रियेमध्ये सहभागी करून घ्यावे.

१८.३. वनशेती व कृषीपूरक व्यवसाय करणाऱ्या युवा गटांना व युवा संस्थांना शासनाने प्रोत्साहन देऊन मदत केली पाहिजे.

१८.४. शासनाने युवा गटांना व युवा संस्थांनी नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करण्यासाठी ठोस उपाय योजने पाहिजेत.

१८.५. शाळा व महाविद्यालयातील शिक्षकांकरिता पर्यावरण संवर्धनाची संकल्पना समजण्यासाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली पाहिजेत. ज्यामुळे हे शिक्षक आपापल्या विद्यार्थ्यांपर्यंत पर्यावरण संवर्धनाचे मूल्य पोचवू शकतील.

१८.६. पर्यावरण संवर्धनासाठी शासनाने प्रसारमाध्यमे व युवांचा योग्य उपयोग करून घ्यावा.

१८.७. पर्यावरणाबद्दलची जागरूकता येण्याकरिता शासनाने सर्व शाळा, महाविद्यालये यांची 'पर्यावरण निर्देशांका'नुसार गुणांकन करावे.

## १९. विरंगुळा व क्रीडा

विरंगुळा व क्रीडा हे युवावस्थेचे अविभाज्य घटक आहेत; तसेच युवांच्या सर्वांगीण विकासाकरिताही महत्त्वपूर्ण घटक आहेत. आराम, विरंगुळा, मनोरंजन व खेळांची संधी मिळणे हा युवांचा अधिकार आहे.

**धोरण मार्गदर्शक तत्त्वे**

१९.१. सर्व औपचारिक व अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्था व सेतू पाठ्यक्रमामध्ये (ब्रिज कोर्स) क्रीडा व विरंगुळा यांसाठी योग्य सुविधा असल्या पाहिजेत.

१९.२. युवांचा शैक्षणिक संस्थेतील २०% वेळ मैदानी खेळ किंवा अभ्यासाव्यतिरिक्त असणाऱ्या इतर उपक्रमांसाठी दिला पाहिजे.

१९.३. शासनाने समुदायातील युवांचे गट हे मनोरंजन व क्रीडा उपक्रमांसाठी मूलभूत घटक मानले पाहिजेत आणि अशा उपक्रमांना प्रोत्साहन देण्याकरिता राज्यस्तरीय विशेष कार्यक्रम घेतले पाहिजेत. स्थानिक पातळीवरील युवा मंडळांमध्ये युवतींचा सहभाग वाढविण्याकरिता आणि युवतींची मंडळे स्थापन होण्याकरिता शासनाने प्रयत्न केले पाहिजेत.

१९.४. ग्रामीण व नागरी वसाहतींमध्ये सार्वजनिक मोकळ्या जागा व मैदाने असली पाहिजेत आणि त्या मोकळ्या जागा युवांसाठी खुल्या असल्या पाहिजे. युवांसाठी असणाऱ्या सर्व मनोरंजन कार्यक्रम व क्रीडांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे. जिल्हा पातळीवर एक समिती स्थापन करून या सर्व उपक्रमांचे सहनियंत्रण करण्यात यावे आणि या समितीमध्ये युवांचे योग्य प्रतिनिधित्व असावे. किशोरी व युवतींसाठी स्थानिक पातळीवर मोकळ्या जागांची प्राधान्याने उपलब्धता करून देण्यात यावी.

१९.५. युवा मंडळे, पथनाट्य, सार्वजनिक मंच, खुला मंच व सांस्कृतिक गटांना शासनाने प्रोत्साहन देऊन मदत करावी.

१९.६. सर्व ग्रामीण व नागरी वसाहतींच्या आराखड्यामध्ये दर हजार लोकसंख्येमागे किमान एक मैदान उपलब्ध करून देण्याची तरतूद करावी.

१९.७. शासनाने दुर्गम भागात क्रीडा व मनोरंजन यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष तरतूद करावी.

१९.८. ग्रामीण व शहरी भागात युवांसाठी वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम आखावेत आणि यामध्ये शिक्षणापासून वंचित राहिलेल्या युवांचा सहभाग वाढविण्याकरिता प्रयत्न करावेत.

१९.९. शासनाने जिल्हा स्तरावर युवांसाठी वसतिगृहांची निर्मिती करावी. ही वसतिगृहे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग घेणाऱ्या व युवा अभिसरण उपक्रमामधील (युथ एक्स्चेंज प्रोग्राम) युवांसाठी राखीव ठेवण्यात यावीत.

१९.१०. शासनाने स्थानिक व इतर खेळांना प्रोत्साहन द्यावे आणि यामध्ये सेवाभावी संस्थांचा सहभाग वाढविण्याकरिता मदत करावी.

## २०. कला व संस्कृती

कला व संस्कृती ही समाजाच्या प्रगल्भतेसाठी मूलभूत आहे. असे वाटते की, शासनाने कला व संस्कृतीच्या अभिव्यक्तीमध्ये हस्तक्षेप करू नये. पण शासनाने सर्व कला व संस्कृतीच्या सर्व प्रकारांचे जतन करण्याकरिता ठोस भूमिका निभवावी. भारतीय राज्यघटनेच्या प्राधान्यानुसार कला व संस्कृतीचे जतन केले पाहिजे. हे धोरण युवांना आपल्या सांस्कृतिक वारशामधील न्याय्य सामाजिक बाबी जतन करण्यासाठी आणि समाजविघातक बाबी दूर करण्यासाठी प्रोत्साहित करते आणि वाव देते.

**धोरण मार्गदर्शक तत्त्वे**

२०.१ शासनाने युवांना महाराष्ट्र व भारताची सांस्कृतिक विविधता निरपेक्षपणे स्वीकारून आदर करण्यासाठी पूरक वातावरण तयार करावे.

२०.२ संस्कृती ही समाजाच्या स्थापना, धारणा व विकासाचा आधार आहे. समाजाच्या स्थापना, धारणा व विकासामध्ये कृषीचे महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून शासनाने कृषी संस्कृती वृद्धिंगत करण्याकरिता विशेष प्रयत्न केले पाहिजेत. शासनाने कृषिउत्सवांची जोपासना करून त्यांना पर्यटनाची जोड दिली पाहिजे.

२०.३ राज्य शासनाने तसेच सेवाभावी संस्थांनी युवा अभिसरण कार्यक्रम राबवावा. जेणेकरून महाराष्ट्र राज्यातील युवांमध्ये सांस्कृतिक विविधतेची जाण व सांस्कृतिक अभिसरण होईल.

२०.४ साहित्य संस्कृती मंडळाच्या सर्व योजना व उपक्रमांचा आढावा घ्यावा आणि त्यामध्ये युवा साहित्यिकांच्या प्रतिभेच्या प्रगल्भतेसाठी तरतूद करावी.

२०.५ सांस्कृतिक धोरणामध्ये युवा वर्गाला त्यांच्या आवडीनुसार अभिव्यक्तीला वाव मिळावा.

२०.६ ग्रामीण जत्रा व यात्रा या सांस्कृतिक अभिसरणाचे व सामाजिक, आर्थिक देवाणघेवाणीचे महत्त्वाचे अधिष्ठान आहेत. म्हणून त्यामधील युवांचा सहभाग वाढवावा आणि या जत्रा व यात्रांना शासनाने मदत करावी.

२०.७ कला व संस्कृतीसाठी स्वतंत्र विषयांची तरतूद शाळा व महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांमध्ये असावी.

२०.८ सध्या विद्यापीठांमध्ये कला व सांस्कृतिक विभाग अस्तित्वात आहेत. या विभागांमधून जे विद्यार्थी कला व संस्कृतीचा विशेष अभ्यास करतील, त्यांना शासनाने रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी.

२०.९ कला व सांस्कृतिक अभिसरणासाठी शासनाने तालुका स्तरावर कला दालने, खुले रंगमंच, वाचनालये व सभागृहे निर्माण करावीत. या अभिसरणाचा केंद्रबिंदू युवा असावा.

२०.१० ललित कला केंद्राच्या धर्तीवर तालुका स्तरावर सांस्कृतिक केंद्र स्थापन करण्यात यावे आणि या सांस्कृतिक केंद्रांमध्ये युवांचा सहभाग जास्तीतजास्त वाढवावा. पारंपरिक लोककला, लोकसंगीत, शास्त्रीय संगीत, ललित कला यांच्या जतन व संवर्धनासाठी दृकश्राव्य दालनाची निर्मिती या तालुका स्तरावरील कला केंद्रांमध्ये करावी.

२०.११ राज्य स्तरावर कलेच्या विविध अभिव्यक्तींसाठी कार्यशाळा व विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत आणि या कार्यशाळा व कार्यक्रमांमध्ये युवा कलावंतांना प्रोत्साहन देण्यात यावे.

२०.१२ सद्यःस्थितीत सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून राबविल्या जाणाऱ्या सांस्कृतिक कार्यांची माहिती शिक्षण विभागामार्फत शाळा व महाविद्यालयांपर्यंत पोचवावी.

## २१. विज्ञान व तंत्रज्ञान

२१ व्या शतकातील जग आणि विशेषत: महाराष्ट्र वेगाने तंत्रज्ञान दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवत चाललेला आहे. परंतु जर बहुसंख्य युवांना या आधुनिक तंत्रज्ञानाची जाण झाली नाही, तर समाजातील दरी तेवढ्याच वेगाने व तीव्रतेने वाढेल. युवा हे नवीन विचारांचे व बदलांचे मुख्य प्रवक्ते आहेत, हे जाणून हे धोरण खालील मार्गदर्शक तत्त्वे मांडत आहे.

**धोरण मार्गदर्शक तत्त्वे**

२१.१. शासनाने युवांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व तर्काधिष्ठित विचार विकसित होण्याकरिता तसेच स्वत:च्या वेळेचा व ऊर्जेचा रचनात्मक कार्याकरिता वापर करण्याकरिता विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

२१.२. विज्ञानाचे शिक्षण अधिक सोपे व रंजक होण्याच्या दृष्टीने औपचारिक व अनौपचारिक शैक्षणिक अभ्यासक्रमात शासनाने बदल करावेत.

२१.३. हे धोरण माहिती तंत्रज्ञानाचा दैनंदिन जीवनातील वाढता प्रभाव व वापर ओळखून अशी शिफारस करते की, पुणेस्थित सी-डॅकने (सेंट्रलाइज्ड डिप्लोमा इन अॅप्लाइड कम्प्युटिंग) निर्माण केलेल्या 'युनिकोड' नावाचे सॉफ्टवेअर सर्व शासकीय कार्यालयांमध्ये वापरण्यात यावे. जेणेकरून राज्यभरातील शासकीय कार्यालयातील संगणकांमध्ये मराठीचा अधिक वापर होईल.

२१.४. शासनाने संगणकाचा वापर दैनंदिन प्रशासनामध्ये वाढविण्याकरिता आणि कागदाचा वापर कमी करण्याचे मार्ग सुचविण्याकरिता विशेष कृती दलाची स्थापना करावी.

२१.५. शासनाने सेवाभावी संस्थांना युवांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्याकरिता सहभागी करून घ्यावे.

२१.६. शासनाने सेवाभावी संस्था व खाजगी क्षेत्राच्या भागीदारीमध्ये विज्ञान केंद्र तालुका स्तरावर स्थापन करावे.

## २२. नागरिकत्व व सहभाग

युवा हे कुठल्याही राज्याचे महत्त्वाचे नागरिक आहेत. म्हणून त्यांनी राज्याच्या विकासामध्ये जरूर सहभाग घेतला पाहिजे. युवा हे समाजातील अविभाज्य घटक असल्याने त्यांच्यामधील निर्णय क्षमता, कौशल्यवृद्धी व नेतृत्व गुण विकसित होण्यासाठी कार्यक्रम घेतले गेले पाहिजेत आणि युवांचा सहभाग वाढेल अशा संधी निर्माण केल्या गेल्या पाहिजेत. अंतिमत: युवांना जबाबदार पालक व जबाबदार नागरिक म्हणून विकसित केले गेले पाहिजे. हे युवा धोरण नागरी समाजाने आतापर्यंत युवांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांचा समाजामध्ये नागरिक म्हणून असलेला सहभाग वाढविण्यासाठी केलेल्या योगदानाची येथे दखल घेते.

**धोरण मार्गदर्शक तत्त्वे**

२२.१. शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या आरक्षण धोरणामध्ये १/३ जागा युवांसाठी राखीव ठेवल्या पाहिजेत.

२२.२. सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व कायद्यांचा आढावा घेण्यासाठी आणि त्या ॲक्टखाली नोंदणीकृत संस्थांच्या शासन व व्यवस्थापन रचनेमध्ये युवांचा सहभाग कसा घेता येईल, यासाठी शासनाने एक समिती गठित करावी.

२२.३. युवांमध्ये स्वयंसेवेची व लोकशाहीची मूल्ये रुजण्याकरिता आणि त्यांनी जबाबदार नागरिक म्हणून वागण्याकरिता शासनाने उपक्रम राबवावेत.

२२.४. युवांपुढील समस्या, समाजात होणारे मूलभूत बदल व त्यांचा युवांवरील परिणाम आणि सर्वांगीण युवा विकास या संदर्भात शासनाने संशोधन करण्याकरिता प्रोत्साहन दिले पाहिजे आणि त्यासाठी तरतूद केली पाहिजे.

२२.५. युवांचा निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये व नागरी समाजाच्या कार्यक्रमांमध्ये कमी होत चाललेला सहभाग हे लोकशाहीसाठी धोकादायक आहे. हा धोका टाळण्यासाठी शासनाने विशेष मोहिमा हाती घेतल्या पाहिजेत; तसेच राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे, नेहरू युवा केंद्राचे उपक्रम आणि सेवाभावी संस्थांनी व समाजातील मंडळांनी हाती घेतलेल्या जाणीवजागृती कार्यक्रमांना प्रोत्साहन देऊन मदत केली पाहिजे. राज्य निवडणूक आयोगाने सध्या यासाठी हाती घेतलेल्या विविध उपक्रमांशी जोडून घेऊन समन्वय साधला पाहिजे.

२२.६. शासनाने सेवाभावी संस्थांच्या मदतीने तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय पातळीवर युवा परिषदांची स्थापना करावी. ही परिषद स्थापन करण्यामागचा हेतू शासनाचे धोरण व कार्यक्रमांची आखणी तसेच अंमलबजावणी या प्रक्रियेमध्ये युवांचा सहभाग वाढविणे हा असावा.

२२.७. युवांमधील सर्जनशीलता व उत्साह यांना अभिव्यक्ती देण्याकरिता वार्षिक युवा वादविवाद स्पर्धा तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर आयोजित केली पाहिजे. या वादविवाद स्पर्धेमधील विषय युवांसाठीचे धोरण, युवांसाठी असलेले विविध कार्यक्रम व योजना तसेच या सर्वांची अंमलबजावणी या संदर्भातील असावेत.

२२.८. प्रभाग स्तरावरील मूलभूत सुविधांसंबंधी होणाऱ्या विकास कामांच्या गुणवत्तेबाबत देखरेखीमध्ये युवांचा सहभाग असावा. सार्वजनिक क्रीडांगणे, उद्याने, सार्वजनिक भूखंड, कचरा व स्थानिक पातळीवरील शासकीय मालमत्ता (उदा. विजेचे खांब, तारा, जलवाहिनी, नाल्या, रस्ते) यांच्या व्यवस्थापनामध्ये युवांसाठी सक्रिय जबाबदाऱ्या असल्या पाहिजेत.

२२.९. जोखीमग्रस्त युवांना स्थानिक निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी शासनाने पोषक वातावरण तयार करावे. जेणेकरून समाजाच्या विकास प्रक्रियेत या युवांचा सिंहाचा वाटा राहील.

## २३. अंमलबजावणी यंत्रणा

२३.१ युवा धोरणाची उद्दिष्टे सर्वव्यापी असल्यामुळे केवळ एका 'युवा व क्रीडा' मंत्रालयाद्वारे युवा धोरणाची अंमलबजावणी यशस्वी होणार नाही. म्हणून अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित मंत्रालयांसह समन्वय साधण्यासाठी प्रभावी प्रणाली निर्माण करणे आवश्यक आहे. समता, स्वातंत्र्य, न्याय, विश्वबंधुत्व या तत्त्वांशी एकनिष्ठ राहून युवकांचा सक्रिय सहभागासह आधुनिक तंत्रज्ञानाचा विनियोग तसेच युवा धोरणाशी निगडित कार्याचा पाठपुरावा व मूल्यमापन अशा संकल्पनेवर आधारित ही अंमलबजावणी प्रणाली कार्यान्वित करावी लागेल. यासाठी राज्य स्तरावर स्वतंत्र समन्वय व केंद्रीकरण मंत्रालय असणे आवश्यक आहे. समन्वय मंत्रालयीन विभाग सर्व मंत्रालयातील युवा विकासाशी निगडित उपक्रमांचा आढावा घेऊन प्रभावी अंमलबजावणीसाठी योग्य ते आदर्श निर्गमित करतील. यामुळे सर्व मंत्रालयीन विभागांमध्ये आपापल्या विकास योजनांमध्ये युवा विकास उपक्रमांच्या समावेशाबाबत सकारात्मक पुढाकार घेणे क्रमप्राप्त ठरेल आणि विविध मंत्रालयांना विभागातील निधीचा विनियोग करताना युवा वर्गाला प्राधान्य देणे शक्य होईल. मात्र, यासाठी समन्वय मंत्रालय विभागाला स्वतंत्र निधीची आवश्यकता आहे. राज्यातील युवा व क्रीडा मंत्रालय युवा विकासाबाबतचे प्रशिक्षण, संशोधन व उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठीचे शिखर मंत्रालय असेल. परंतु ही अंमलबजावणी सर्व मंत्रालयांच्या सहकार्याने होणे आवश्यक आहे. यासाठी राज्य स्तरावरचे समन्वय मंत्रालय इतर मंत्रालयांकडून घेणारे उपक्रम युवा व क्रीडा मंत्रालयाला जोडले जातील आणि संयुक्त उपक्रमातून एकात्मिक नियोजन करून उपक्रम यशस्वी होण्यासाठी समन्वय मंत्रालय पुढाकार घेईल. समन्वय मंत्रालयाची संकल्पना केंद्र सरकारने साकार केली असून राज्य स्तरावरील समन्वय मंत्रालय केंद्र सरकारातील समन्वय मंत्रालयाशी संलग्नित होऊ शकेल. यामुळे युवा धोरणाच्या अंमलबजावणीसाठीचा केंद्र सरकारचा निधी राज्यातील समन्वय मंत्रालयाद्वारे सुलभतेने निर्मित होईल.

समन्वय मंत्रालयाद्वारे राज्यातील सर्व युवा विकास उपक्रमांचा समन्वय होईल. यासाठी या मंत्रालयाला वरिष्ठ सनदी अधिकारी (अतिरिक्त प्रमुख सचिव दर्जा) आणि स्वतंत्र मंत्री असल्यास अंमलबजावणी करणे सुलभ होईल. समन्वय मंत्रालय, राज्य नियोजन आयोग व राज्य युवा आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतील. प्रशासकीय सबलीकरणासाठी समन्वय मंत्रालयाला अर्थ, शिक्षण, आरोग्य, उद्योग, कृषी, समाजकल्याण/सामाजिक न्याय, महिला व बालकल्याण मंत्रालयाचे पाठबळ मिळणे आवश्यक आहे.

२३.२ युवा विकासाच्या सर्व उपक्रमांमध्ये सर्जनशीलता, नावीन्यपूर्ण कृती योजना, सूक्ष्म नियोजनाला प्राधान्य दिले पाहिजे.

२३.३ लोकशाही प्रक्रियेत युवा धोरणाच्या अंमलबजावणीत खंड पडू नये, यासाठी अर्धन्यायिक अधिकार असलेले नियामक मंडळ 'राज्य युवा आयोग' प्रस्थापित करणे आवश्यक आहे. या आयोगात समाज संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, युवा विकास क्षेत्रात कार्य करणारे कार्यकर्ते, शासन निर्देशित व्यक्ती, अनुसूचित जाती-जमातीतील तज्ज्ञ व्यक्ती इत्यादींचा समावेश असावा.

२३.४ जिल्हा स्तरावर 'जिल्हा युवा केंद्र' प्रस्थापित व्हावेत. या जिल्हास्तरीय केंद्रांतून सर्व युवा विकास उपक्रमांची अंमलबजावणी व्हावी. ही केंद्रे युवा आणि क्रीडा मंत्रालयाच्या अधीन असतील. उपजिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी या केंद्राचे प्रमुख असावेत.

२३.५ तालुका स्तरावर व गट ग्रामपंचायत (समूह) स्तरावर 'युवा मंडळ' प्रस्थापित व्हावेत. ही युवा मंडळे नोंदणीकृत असतील आणि जिल्हा युवा केंद्रात मंडळाचे नाव अधिकृतपणे सहभागी मंडळ म्हणून नोंद करणे आवश्यक राहील. सदर युवा मंडळाद्वारे विविध युवा विकास उपक्रम वस्ती पातळीवर/गाव पातळीवर राबविले जातील.

## २४. युवा धोरणाचे नियमन

२४.१ न्याय यंत्रणा वा तत्सम अधिकार असणाऱ्या 'राज्य युवा आयोगा'ची स्थापना करण्यात आली पाहिजे. या आयोगात समाजातील विविध जबाबदार घटकांचा समावेश असला पाहिजे. जसे, सामाजिक प्रतिनिधी, विचारवंत, सामाजिक शास्त्रज्ञ, कायदेशीर तज्ज्ञ व युवांसोबत काम करणाऱ्या व्यक्ती. या घटकांमध्ये वंचित व गरीब प्रवर्गातील प्रतिनिधींचा अंतर्भाव राहील, याची सुनिश्चिती करून घेतली पाहिजे.

२४.२ या आयोगाचे काम प्रामुख्याने राज्य युवा धोरणाचे नियमन करणे हे राहील. हा आयोग पुढील प्रमुख जबाबदाऱ्या पार पाडेल :

२४.२.१ युवा धोरणाची अंमलबजावणी व प्रभावाचे सनियंत्रण, आढावा व मूल्यांकन करणे.

२४.२.२ युवा धोरण व कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित खाती व संस्थांना प्रश्नानुरूप मार्गदर्शन करणे.

२४.२.३ युवांच्या प्रश्नांसंदर्भात तक्रार निवारण समिती म्हणून काम करणे.

२४.२.४ युवा धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यरत असलेल्या सल्लागार उपसमित्या, सनियंत्रण गट व नेमून दिलेले सल्लागार यांना संयुक्त स्तरावर सहभागी पद्धतीने सहकार्य करणे.

२४.२.५ युवांचे प्रश्न व या संकल्पनांचे संबंधित संशोधन प्रक्रियांना उत्तेजन देणे.

२४.२.६ सरकारच्या विविध खात्यांची धोरणे तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये युवांच्या प्रश्नांना व मुद्द्यांना समाविष्ट करणे; तसेच त्या धोरणांमध्ये युवांच्या विकासाशी संबंधित उपक्रमांसाठी पुरेशा निधीची तरतूद करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

## २५. सनियंत्रण व मूल्यमापन

२५.१ या धोरणांतर्गत घेतल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांचे सनियंत्रण व मूल्यमापन हे साध्य आधारित पद्धतीने केले जावे, अशी शिफारस हे धोरण करते. या धोरणाच्या कार्यक्रमांचे सनियंत्रण युवा धोरणाशी संबंधित घटकांनी सादर केलेल्या मासिक अहवालाच्या माध्यमातून दर दोन वर्षांनी करण्यात यावे. धोरणांतर्गत कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन उपलब्ध करणे तसेच त्यातून अपेक्षित परिणाम साध्य होण्यासाठी प्रक्रियेस सहाय्यभूत राहणे, हा या सनियंत्रणामागचा मुख्य हेतू आहे. युवा आयोगाने सनियंत्रणाच्या या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका निभावली पाहिजे. यासाठी सल्लागार उपसमिती स्थापन करण्यात यावी; ज्यात सरकारी अधिकाऱ्यांसह विविध सामाजिक स्तरावरील प्रतिनिधी व युवा मंडळांचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल.

२५.२ धोरणाचे मूल्यमापन दर तीन वर्षांनी करण्यात यावे. धोरणाच्या प्राधान्यक्रमानुसार सुनिश्चित केलेल्या अपेक्षित उद्देश व प्रभावाच्या आधारे मूल्यमापनाचे दर्शक तयार करण्यात यावेत.

२५.३ शासनाच्या युवा धोरणाशी संबंधित खात्याच्या वतीने दरवर्षी तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर युवा विकास अहवाल तयार करण्यात यावा. हे अहवाल प्रस्तावित सनियंत्रण व मूल्यमापनाच्या निष्कर्षांवर आधारलेले असतील.

## २६. आव्हाने

या धोरणासमोर संभाव्य आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत :

२६.१ समाजातील सर्व विकास क्षेत्रांनी तात्त्विक पातळीवर या धोरणाला मुख्य प्रवाहाचा भाग केले तरच हे धोरण प्रभावीपणे अमलात येईल.

२६.२ व्यापक राजकीय इच्छाशक्ती व स्वतंत्र युवा धोरणासाठीच्या किमान सहमतीचा अभाव.

२६.३ युवा धोरणांतर्गत सुचविण्यात आलेल्या अपेक्षित अंमलबजावणी यंत्रणा लालफितीच्या कारभाराचा बळी पडण्याची शक्यता आहे. युवा धोरणातील अंमलबजावणीला योग्य ते प्राधान्य मिळण्याची कमी शक्यता.

२६.४ पुरेशा संसाधनांची जुळवाजुळव ही कोणत्याही धोरणाच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका निभावते. त्यामुळे निधीची अनुपलब्धता हा या धोरणाच्या अंमलबजावणीतील मोठा अडथळा ठरू शकतो.

२६.५ युवा धोरणातील अंमलबजावणीत युवा वर्गाचा सहभाग हा त्या-त्या समाजातील युवांच्या संदर्भानुसार बदलण्याची शक्यता.

२६.६ युवा धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कुटुंब व सार्वजनिक जीवनातील वयस्क व्यक्तींसोबत काम करणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांचे असहकार्य व निर्णयप्रक्रियेत युवांना अवकाश देत सहभागी करून घेण्याविषयी विरोधामुळे युवा धोरणाच्या अंमलबजावणीत मोठे अडथळे येऊ शकतात.

२६.७ वाढते खाजगी क्षेत्र व त्या अनुषंगाने येणारे युवांच्या मोकळ्या वेळेचे झालेले बाजारीकरण व त्या संबंधी अन्य घटकांना नष्ट करण्याचे काम एकटे युवा धोरण करू शकत नाही.

## २७. आढावा

युवा धोरण जाहीर झाल्यापासून पाच वर्षांनी धोरणात प्रस्तावित केलेल्या विविध पुढाकारांच्या माध्यमातून धोरणाविषयीची स्पष्टता व प्रत्यक्ष परिणामात मिळालेल्या यशाचा आढावा घेण्यात येईल. तसेच भविष्यातील धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्यात योग्य त्या सुधारणा करण्यात येतील.

## २८. परिशिष्टे : (अ) कृती आराखडा

२८.१. क्रीडा व युवक कल्याण खात्याच्या नावाऐवजी क्रीडा व युवा विकास खाते असे संबोधावे. जणेकरून व्यापक पातळीवर युवक-युवतींचा सहभाग यामध्ये अधोरेखित होईल.

२८.२. केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण खात्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य शासनाने क्रीडा व युवक कल्याण खात्यामध्ये क्रीडा विभागासाठी व युवक कल्याण खात्याकरिता दोन सचिव दर्जाचे वेगवेगळे अधिकारी नियुक्त करावेत. जेणेकरून दोन्ही खात्यांच्या विविध उपक्रमांना योग्य पातळीवर न्याय देता येईल.

२८.३. महाराष्ट्र राज्य शासनाने राज्य युवा आयोग निर्माण करावा. जेणेकरून शासनातील विविध खात्यांमधून युवांविषयी असलेल्या योजनांकरिता युवक-युवतींना त्यांचे प्रश्न, समस्या, सूचना मांडण्यात मदत होईल.

२८.४. महाराष्ट्र राज्य शासनाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या धर्तीवर युवा विकाससंदर्भातील कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात जिल्हा युवा विकास अधिकारी कार्यालयाची निर्मिती करावी. त्या ठिकाणी जिल्हा युवा अधिकारी व त्या संदर्भात स्वतंत्र यंत्रणा उभी करावी.

२८.५. महाराष्ट्र राज्य शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण खात्यातर्फे या पूर्वी सुरू असलेली युवा विकाससंदर्भात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवांना दिला जाणारा 'राज्य युवा पुरस्कार' पुनश्च सुरू करावा. विभागीय युवा पुरस्कार (प्रत्येक विभागातून एक युवक व युवती) व अंतिम राज्यस्तरीय युवा पुरस्कार (एक युवक व युवती) अशी या योजनेची रचना असावी.

२८.६. महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीर झाल्यानंतर त्यातील योजनांची व महत्त्वपूर्ण बाबींची माहिती राज्यातील सर्व युवक-युवतींना मिळावी आणि त्या योजनांचा त्यांनी लाभ घ्यावा, याकरिता राज्य पातळीवर जनजागृती मोहीम हाती घेण्यात यावी. युवा धोरणाप्रती जिल्हा पातळीवर शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, युवा संघटना, पक्षीय युवा संघटना यांच्यापर्यंत मुबलक प्रमाणात पोहोचविण्यात याव्यात.

२८.७. महाराष्ट्र राज्य शासनाने विधानसभेमध्ये युवा विकाससंदर्भात विविध खात्यांमधील विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता माननीय आमदारांची अंतर्गत समन्वय समिती स्थापन करावी.

२८.८. महाराष्ट्र राज्य शासनाच्या विविध खात्यांमार्फत युवांना रोजगार व स्वयंरोजगार योजनेच्या आतापर्यंतच्या कार्याचा एकत्रितपणे आढावा घेऊन योजनांची व्याप्ती वाढवावी.

२८.९. महाराष्ट्र राज्य शासनाने युवक कल्याण खात्यामार्फत एक अभ्यास समिती स्थापन करून शासनाच्या विविध खात्यांमार्फत तसेच इतर राज्यांतील शासनामार्फत रोजगार व स्वयंरोजगाराकरिता तयार केलेल्या विविध

योजनांचा अभ्यास करून त्यातील महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेऊन त्या संदर्भात रोजगार व स्वयंरोजगार खात्यासोबत काही नवीन योजनांची अंमलबजावणी करावी.

२८.१०. युवक कल्याण खात्याशी संलग्नित विविध युवक मंडळामध्ये युवतींची संख्या ही युवकांशी समान असावी. या युवा मंडळांना युवक कल्याण खात्याशी संलग्न करताना व त्यांची नोंदणी करताना या युवा मंडळामध्ये कमीतकमी ३०% युवतींचे सदस्यत्व बंधनकारक असावे.

२८.११. केंद्र शासनाचा युवक कल्याण विभाग, नेहरू युवा केंद्र, विविध स्वयंसेवी संस्थांतर्फे युवा विकासात्मक राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांमध्ये राज्य शासनाच्या युवक कल्याण विभागाने सहभागी व्हावे. त्याचबरोबर राज्य सरकारच्या युवक कल्याण खात्याने इतर शासकीय युवा खात्यांपेक्षा वेगळ्या युवा विकासात्मक योजना जाहीर कराव्यात. या निमित्ताने शासनाच्या विविध खात्यांमध्ये युवाविषयक योजनांकरिता होणारी फलदायी स्पर्धा ही महाराष्ट्रातील युवांकरिता नक्कीच उपयुक्त राहील.

२८.१२. महाराष्ट्र शासनाच्या युवक कल्याण खात्याचे मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण खाते) यांच्या अध्यक्षतेखाली युवक कल्याण खाते- महाराष्ट्र राज्य, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी., स्काउट-गाईड, युवा विकासविषयक कार्य करणाऱ्या संस्था व संघटनांच्या प्रतिनिधींना सहभागी करून सर्व युवाविषयक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता राज्यस्तरीय समन्वय समिती स्थापन करावी.

२८.१३. तालुकास्तरीय युवा विकास सल्लागार समिती बनविण्यात यावी. या समितीमध्ये विविध सामाजिक घटक, गैरसरकारी संस्था, युवा मंडळे यांतील युवांचा समावेश असावा.

२८.१४. शासनाच्या आरोग्य विभागाबरोबरच आरोग्य क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या सामाजिक संस्थांनी, युवांमध्ये एड्स जाणीव जागृतीबरोबरच इतर घातक संसर्गजन्य रोगांसंदर्भात जाणीवजागृतीबाबत आग्रही भूमिका धरावी.

२८.१५. युवांमध्ये व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत जाणीवजागृती करून व्यसने टाळण्यासाठी उद्युक्त करावे. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी. व युवा मंडळे यामधील युवांमार्फत व्यसनमुक्ती केंद्र स्थापन करून चालवावीत.

२८.१६. भारत सरकारच्या योजनेप्रमाणे राज्य युवा केंद्र व जिल्हा युवा केंद्र स्थापन करण्यास पुढाकार घ्यावा. ही युवा केंद्रे शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व इतर युवा कार्यक्रमांसाठी एक खिडकी योजनेंतर्गत महत्त्वाची ठरतील.

२८.१७. या अंतर्गतच राज्यस्तरीय निवासी युवा प्रशिक्षण केंद्र एका वर्षात स्थापन करण्यात यावे. यामध्ये राज्यातील विविध भागांतील युवा प्रतिनिधींसाठी या धोरणामध्ये नमूद केलेल्या मूल्यांवर आधारित प्रशिक्षण दिले जाईल.

२८.१८. समाजामध्ये युवांच्या अधिकार व युवांसंबंधीचे मुद्दे संदर्भात जाणीवजागृती कार्यक्रम हाती घेण्यात यावा.

२८.१९. राज्य युवा समितीतर्फे युवांच्या सद्यःस्थितीवर दरवर्षी युवास्थिती अहवाल प्रकाशित करण्यात यावा.

२८.२०. गाव व तालुकास्तरीय युवा मंडळांकरिता राज्यस्तरीय समन्वय समितीतर्फे एक विस्तृत मार्गदर्शिका तयार करण्यात यावी. या मार्गदर्शिकेत या समितीचा वर्षभराचा कृती आराखडा त्यांच्या उद्दिष्टांसकट देण्यात यावा.

# परिशिष्ट (ब) अंमलबजावणीची संरचना



## परिशिष्ट (क) कार्यकारी मसुदा समिती

| | | | |
|---|---|---|---|
| **अध्यक्षा** | **-** | **मा. सुप्रिया सुळे** | |
| **समन्वयक** | - | मा. नीलेश पुराडकर | |
| **सदस्य** | - | मा. प्रा. लता नारायण | मा. मॅथ्यू मट्टम |
| | | मा. कौस्तुभ देवळे | मा. डॉ. आर. आर. शिंदे |
| | | मा. दत्ता बाळसराफ | मा. विश्वास ठाकूर |
| | | मा. नीलेश राऊत | मा. महेंद्र रोकडे |
| **मसुदा समिती** | - | मा. नरेंद्र लांजेवार | मा. डॉ. आनंद बंग |
| | - | मा. अतुल कहाते | मा. अनिता पगारे |
| | - | मा. संजय पाटील | मा. दिलीप पांढरपट्टे |
| | - | मा. ॲड. असीम सरोदे | |
| **विशेष सहकार्य** | - | मा. समीर दलवाई | मा. डॉ. आनंद करंदीकर |
| | - | मा. विजय कान्हेकर | मा. दिनेश शिंदे |
| | - | मा. भगवान केसभट | मा. डॉ. अन्वर शेख |
| | - | मा. डॉ. अमित नागरे | |

**सहयोगी संस्था** -

- टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस
- अनुभव शिक्षा केंद्र-निर्मला निकेतन महाविद्यालय
- युवा-मुंबई
- कोरो-मुंबई
- सीवायडीए-पुणे
- नवनिर्माण-मुंबई
- विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट-नाशिक
- अभ्युदय फाउंडेशन-औरंगाबाद
- पिम्प्से
- महात्मा गांधी सेवा संघ
- चलो युवा कुछ कर दिखाए
- रसिकाश्रय
- युवाहित
- युथ टू युथ
- सीसीडीटी
- भरारी ग्रुप
- कशिश फाउंडेशन
- हनुमान व्यायामशाळा-अमरावती

## २९. संदर्भसूची


| | | |
|---|---|---|
| 1. | Government of India, 2007 | Maharashtra Development Report; Planning Commission, Delhi: Academic Foundation |
| 2. | Office of the Registrar General and Census Commissioner, India. | Census of India, Provisional Population Totals: Maharashtra, Series 28, Paper 1 of 2001; New Delhi: Office of the Registrar General and Census Commissioner. |
| 3. | 2001b | |
| 4. | Ministry of Youth Affairs and sports, Government of India, 1988 | National Youth Policy, 1998 |
| 5. | Ministry of Youth Affairs and Sports, Government of India | National Youth Policy, 2003 |
| 6. | 2003 | |
| 7. | Government of India, 2001 | National Policy for empowerment of women |
| 8. | Government of India, Department of Education, 1998 | National Pollicy on Education, 1968, (As modified in 1992) |
| 9. | Government of Maharashtra, 2002, | Human Development Report, Maharashtra, Planning Department, Mumbai] |
| 10. | Planning Commission, 2007 | Poverty Estimates for 2004-05; New Delhi: Government of India |
| 11. | Indian Institute of Population Studies, 2006 | Youth in India: Situation and Needs |
| 12. | UNDP, 2000 | Millennium Development Goals, U.N. website |
| 13. | United Nationa, General Assembly 1995 | World Program of Action for Youth to the year 2000 and beyond |
| 14. | United Nations Educational Scientific and Cultural Organisation | Empowering Youth Through National Policies |
| 15. | The Presidency, Republic of South Africa, 2008 | National Youth Policy, 2008-2013 |
| 16. | Government of Pakistan, 2006 | National Youth Policy, 2006 |

| | | |
|---|---|---|
| 17. | Ministery of Youth and Sports, Sierra Leonne, 2003 | National Youth Policy |
| 18. | Ministry of Labor, Government of India, 2008 | Draft National Employment Policy,2008 |
| 19. | Ministry of Labor, Government of India, 2009 | National Policy on Skill Development |
| 20. | Ministry of Labor, Government of India, 2009 | National Policy on Safty, Work and Enviornment at workplace. |
| 21. | State of Maharashtra, 1994 | Women's Policy |
| 22. | State of Maharashtra, 2001 | Employment and Self-Employment Policy |
| 23. | Ministry of Youth Affairs and Sports, Government of Maharashtra, 2006 | Interim report on sports policy of Mahrashtra |
| 24. | Jharkhand Government, 2007 | Jharkhand Youth Policy, |
| 25. | Himachal Pradesh Government, 2002 | H. P. State Youth Policy, 2002 |
| 26. | Madhya Pradesh Government, 2008 | Madhya Pradesh Youth Policy, 2008 |
| 27. | Government of Karnataka, 2008 | State Youth Policy |

# महाराष्ट्र राज्य युवा धोरण (प्रस्तावित)

# व्यापक चर्चेसाठी प्राथमिक मसुदा

सादर

**मा. मुख्यमंत्री**
**मा. उपमुख्यमंत्री**
**मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण)**
**मा. राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण)**
**महाराष्ट्र राज्य**

सादरकर्ते

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**
**नवमहाराष्ट्र युवा अभियान**

**शनिवार, दि. ८ ऑगस्ट २००९**

युवा पिढीच्या हाती राष्ट्राचं भवितव्य सुरक्षित आहे असे मी मानतो. कारण, तरुण पिढीला उत्तम सामाजिक जाण असते. उत्साह, प्रामाणिकपणा, तळमळीने काम करण्याची क्षमता त्यांच्यात दिसून येते. त्यांना योग्य संधी मात्र मिळायला हवी.

– **मा. यशवंतराव चव्हाण**